महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (MahaSARC) ची स्थापना करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२५/ई-१०८२८४०/विशि-३**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २२ एप्रिल, २०२५

**प्रस्तावनाः**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या धोरणाचा अभ्यास करुन राज्य शासनास अहवाल सादर करण्यासाठी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयानुसार डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यबल गटाची स्थापन करण्यात आली होती. या कार्यबल गटाने सादर केलेल्या अहवालामध्ये अभ्यासक्रम या मुद्दयाच्या अनुषंगाने तीन/ चार वर्षाच्या बहुविद्याशाखीय पदवीपुर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या रचनेसंदर्भात सर्व विद्यापीठांच्या संबंधित विषयाच्या अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांचे प्रतिनिधीत्व असलेला ई-अभ्यासमंडळ मंच (e BoSF) स्थापन केला जाईल अशी शिफारस केली आहे.

डॉ.माशेलकर समितीने शिफारशीत केल्याप्रमाणे सर्व विद्यापीठांच्या संबंधित विषयाच्या अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांचे प्रतिनिधीत्व असलेला ई- अभ्यासमंडळ मंच (e BoSF) स्थापन करताना त्याचे व्यवस्थापन करणे सोयीस्कर व्हावे म्हणून ई अभ्यासमंडळ मंच विषयनिहाय किंवा विद्याशाखेनिहाय गठीत करावेत, यासंदर्भात तसेच, त्याची सदस्यसंख्या मर्यादीत ठेवण्यासंदर्भात विचारविनिमय करुन शिफारस करण्यासाठी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक २९ ऑगस्ट,२०२३ अन्वये कुलगुरुंची समन्वय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये पुढीलप्रमाणे प्रमूख तरतूदीं आहेत-

१) विद्यार्थ्यांना एका विद्याशाखेतून दुसऱ्या विद्याशाखेमधील अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी लवचिकता प्रदान करणे,

२) विद्यार्थ्यांना सर्व विषयांमध्ये त्यांच्या आवडीचे अभ्यासक्रम निवडण्याची संधी प्रदान करणे,

३) प्रमाणपत्र / पदविका/ पदवी शिक्षणक्रमात पात्र क्रेडिट्सनुसार ऐच्छिक प्रवेश आणि बाहेर पडण्याचे पर्याय उपलब्ध करणे,

४) विद्यार्थ्यांना एका संस्थेतून दुसऱ्या संस्थेत जाण्यासाठी लवचिकता प्रदान करणे जेणेकरून त्यांना प्रवेशाचे अनेक पर्याय आणि/ किंवा आंतर-विद्याशाखीय शिक्षणाची संधी उपलब्ध करणे,

५) पर्यायी शिक्षण पद्धतीत (जसे ऑफलाइन, दूरस्थ शिक्षण प्रणाली आणि ऑनलाइन शिक्षण आणि संकरित शिक्षण पद्धती) जाण्याची लवचिकता प्रदान करणे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७७ मध्ये महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगासंदर्भात तरतूद आहे. कलम ७७ (१) मध्ये या आयोगाची कार्ये व कर्तव्य विहित केले आहेत. त्यापैकी काही कार्ये व कर्तव्य पुढीलप्रमाणे आहेत.

(घ) राज्यातील विविध प्रकारच्या शैक्षणिक संस्थांमधील केवळ तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणातील मुख्य व क्षेत्र विनिर्दिष्ट कोशल्ये यांमध्ये सहकार्य व सहअस्तित्व राखणे यासाठी धोरणात्मक व कार्यात्मक स्तरावर समन्वय साधणे:

(ङ) शिक्षण देताना, शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करताना, शिक्षणाचे प्रशासन व नियमन आदीमध्ये राष्ट्रीय व जागतिक पातळीवर होत असलेला विकास जाणून घेणे व त्याचा मागोवा घेणे व त्या बदलानुरूप राज्यातील शिक्षणपद्धतीमध्ये यथोचित धोरण व कार्यतंत्र विकसित करणे:

(च) शैक्षणिक परिसंस्थामधील विविध विद्या शाखांतील व निरनिराळ्या विद्याशाखांबाहेरील शुध्द व उपयोजित क्षेत्रातील सर्व विषयांमधील संशोधन संस्कृती तसेच संशोधन संस्कृतीद्वारे उद्योगांमधील गरजा व मागण्या यांमधील परिणामकारक धोरणामार्फत समन्वय साधणे:

(छ) विविध शैक्षणिक परिसंस्था व राज्य, केंद्र व औद्योगिक संशोधन आणि विकास प्रयोगशाळा यांमध्ये शैक्षणिक व ज्ञान स्त्रोधन सुविधांच्या सहभागासाठी धोरण व कृतियोजना तयार करणे;

(ज) प्रगत वातावरणात (फ्रंटलाइन) अध्यापन-अध्ययन प्रक्रियांकरिता डिजीटल स्वरूपात ई-अध्ययन साहित्य व आभासी प्रयोग व आधारभूत साहित्य यांचा संग्रहसाठा निर्माण करणे;

(ड) समाजाचे एकूण अग्रक्रम, दृष्टिकोन व गरजा आणि उच्च शिक्षणाकडून असणाऱ्या अपेक्षा लक्षात घेऊन, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील विविध विषयांवर अध्ययनक्रम तयार करणेः

(ढ) विद्यापीठांमधील शिक्षणाचा दर्जा निश्चित करण्याच्या व त्यात एकरूपता राखण्याच्या संबंधात राज्य शासनाला सल्ला देणे;

(ण) निरनिराळ्या शैक्षणिक परिसंस्थांमधील सहकार्य व समन्वय यास बालना देण्यासंबंधात सल्ला देणे आणि एकीकडे विद्यापीठ व दुसरीकडे उद्योग आणि इतर संघटना यांच्यात आदानप्रदान करण्यास कितपत वाव आहे ते पाहणे;

(ध) उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील अध्यापन, संशोधन व विस्तार यांच्याशी संबंधित विविध उपक्रमांकरिता आंतर-विद्यापीठ कार्यक्रम सुरू करणे;

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची कार्ये पार पाडण्यासाठी कलम ७७ (२) मध्ये व्यवस्थापन मंडळाची तरतूद करण्यात आली असून कलम ७७ (६) मध्ये व्यवस्थापन मंडळाचा सदस्य सचिव म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) च्या जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३३ विद्यापीठाच्या विद्यापरिषदेचे अधिकार व कर्तव्य विहित केले आहेत. त्यातील कलम ३३ (१) (ब) मध्ये राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांच्या स्थानानंतरणाबाबतचे धोरण तयार करणे तसेच राज्यातील एका विद्यापीठातील किंवा इतर विद्यापीठांमधील विविध विद्याशाखांमधून निरनिराळ्या पाठ्यक्रम रचनांची निवड करण्यास आणि त्याचे अध्ययन करण्यास लवचिकता आणण्याबाबतचे धोरण निर्धारीत करणे अशी तरतूद आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मधील उपरोक्त नमूद प्रमूख तरतूदींच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ७७ (१), कलम ७७ (२), कलम ७७ (६) आणि कलम ३३ (१) (ब ) मधील तरतूदी विचारात घेऊन १. महाराष्ट्रातील विद्यापीठांद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध मोड्युल, शिक्षणक्रम आणि अभ्यासक्रमात शैक्षणिक समतुल्यता प्रदान करणे; २. राष्ट्रीय क्रेडिट फ्रेमवर्क (NCrF) अंतर्गत सूचित केल्याप्रमाणे वेगवेगळ्या स्तरांवर (४.५ -८) क्रेडिट ट्रान्सफर यंत्रणेच्या विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे; आणि ३. राज्य विद्यापीठांमध्ये सहकार्य, समन्वय आणि नवोपक्रम संस्कृती निर्माण करणे याबाबतचे अधिकार असलेल्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (MahaSARC) ची स्थापना करण्याची शिफारस सदर समितीने केली आहे.

सदर समन्वय समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (MahaSARC) ची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतूदींची राज्यामध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने, विद्यापीठांचे मुख्य उद्दिष्ट- ज्ञानाची निर्मिती, जतन व प्रसार करणे तसेच अध्यापन, संशोधन, कौशल्यविकास, प्रशिक्षण, शिक्षण आणि विस्तार कार्याद्वारे समाजावर सकारात्मक प्रभाव टाकणे याच्या अनुषंगाने आणि अधिनियमातील कलम ७७ व कलम ३३ (१) (ब)

मधील तरतूदींच्या अनुषंगाने उच्च शिक्षण, संशोधन व नवोपक्रम या क्षेत्रातील उत्कृष्टता अधिक बळकट करण्यासाठी व त्यास पुढे नेण्यासाठी राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरील संकल्पना, विचारसरणी, चिंतनप्रक्रिया आणि तर्कशास्त्र यांची व्यापक स्वरुपात देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी व मार्गदर्शक सूचना तयार करण्यासाठी राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (MahaSARC) ची स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (MahaSARC) ची रचना, अधिकार व जबाबदा-या आणि कार्यपद्धती याबाबतच्या **सविस्तर सूचना** सोबतच्या **परिशिष्ट-अ (मराठी मध्ये) व परिशिष्ट- ब (इंग्रजी मध्ये)** विहित करण्यात आल्या आहेत.

३. MahaSARC मध्ये नामनिर्देशित करण्यात आलेल्या अशासकीय सदस्यांना बैठकीसाठीचा प्रवासभत्ता व इतर अनुषंगिक भत्यांसाठी स्वतंत्रपणे निर्णय निर्गमित करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२५०४२२१८४८५४९९०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2025.04.23 11:18:47 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,

९. कुलगुरु, सर्व अकृषि सार्वजनिक विद्यापीठे/ समुह विद्यापीठे/ अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
१०.कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे जि. रायगड
११.कुलगुरु, कॉलेज ऑफ इंजिनियरींग, पुणे विद्यापीठ, पुणे (COEP Pune)
१२.कुलगुरु, इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी,मुंबई (ICT, Mumbai)
१३.कुलगुरु, सर ज. जी. कला, वास्तुकला, अभिकल्प विद्यालय, मुंबई
१४.कुलसचिव, सर्व अकृषि सार्वजनिक विद्यापीठे/ समुह विद्यापीठे/ अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
१५.कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे जि. रायगड
१६.कुलसचिव, कॉलेज ऑफ इंजिनियरींग, पुणे विद्यापीठ, पुणे (COEP, Pune)
१७.कुलसचिव, इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी,मुंबई (ICT, Mumbai)
१८.कुलसचिव, सर ज. जी. कला, वास्तुकला, अभिकल्प विद्यालय, मुंबई
१९.प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा), मुंबई,
२०.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२.संचालक, कला संचालनालय, मुंबई
२३. सर्व सहसचिव/ उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२४.निवडनस्ती (विशि-३).

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण- २०२५/ ई-१०८२८४० / विशि-३
दिनांक २२.०४.२०२५ सोबतचे

**परिशिष्ट-अ**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (MahaSARC)

१. MahaSARC हे राज्यस्तरीय सर्वोच्च मार्गदर्शक प्राधिकरण असेल-

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण आणि विकास आयोग (MAHED) व त्याचे व्यवस्थापन मंडळ (BoM) यांना उच्च व तंत्रशिक्षणातील धोरण निर्मितीसाठी सल्ला देणारी सल्लागार संस्था म्हणून MahaSARC कार्य करेल.

MahaSARC राज्यस्तरीय सर्वोच्च शैक्षणिक प्राधिकरण म्हणून पुढील शैक्षणिक बाबींसंदर्भात देखील कार्य करेल आणि संशोधनाला चालना देण्यासाठी शासनाला सल्ला देईल:

i. एका विद्यापीठा अंतर्गत किंवा विविध विद्यापीठांदरम्यान विद्यार्थ्यांचे स्थलांतर सुलभ करण्यासाठी श्रेयांक मान्यता, श्रेयांक समतुल्यता आणि श्रेयांक हस्तांतरणाची औपचारिक यंत्रणा विकसित करुन लवचिक अध्यापन- अध्ययन- मुल्यांकन प्रक्रीयेस चालना देणे.

ii. राज्यातील विविध अकृषि विद्यापीठांकडे उपलब्ध असणाऱ्या अभ्यासक्रमांना, मोड्युल्सना व अध्ययनक्रमांमध्ये शैक्षणिक समतुल्यता (equivalence) प्रदान करणे.

iii. राष्ट्रीय श्रेयांक आराखड्यामधील (नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क (NCrF) ) विविध स्तरांवरील (४.५ ते ८) श्रेयांक हस्तांतरण यंत्रणा विकसित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे.

iv. राज्यातील अकृषि विद्यापीठांमध्ये सहकार्य, समन्वय आणि एकात्मतेद्वारे सशक्त संशोधन व नवप्रवर्तन संस्कृती (synergy) निर्माण करणे.

२. MahaSARC ची रचना -

MahaSARC ची रचना खालीलप्रमाणे असेल,

| अ.क्र. | | पदनाम |
|---|---|---|
| i | NIRF क्रमवारीतील राज्यातील पहिल्या ५ सार्वजनिक विद्यापीठांचे किंवा NAAC- A ग्रेड असलेल्या राज्य अकृषि विद्यापीठांचे कुलगुरू.<br>तसेच जेथे कला शिक्षणाशी संबंधित बाब विचारार्थ असेल त्यावेळी MahaSARC मध्ये कुलगुरु, सर ज. जी. कला, वास्तुकला, अभिकल्प विद्यालय, मुंबई यांचा समावेश करण्यात येईल. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **वरील ५ पैकी एका कुलगुरूची अध्यक्ष म्हणून नियुक्ती राज्य शासनाद्वारे करण्यात येईल.** अध्यक्षपदाचा कार्यकाळ एक वर्षाचा असेल. | | |
| ii | महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापन मंडळाचे सदस्य सचिव - | - | संयोजक व उपाध्यक्ष |
| iii | तीन प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ राज्यशासनाद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील (त्यापैकी किमान एक सदस्य UGC/ NAAC/ AICTE या संस्थांचे माजी अध्यक्ष/ माजी उपाध्यक्ष असतील ) | | सदस्य |
| iv | दोन प्र- कुलगुरू- राज्यशासनाद्वारे नामनिर्देशित | - | सदस्य |
| v | संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | - | सदस्य |
| vi | संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई | - | सदस्य |
| vii | राज्यातील वेगवेगळ्या अकृषि सार्वजनिक विद्यापीठांमधील चार भिन्न विद्याशाखांचे चार अधिष्ठाता- राज्यशासनाद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील. | - | सदस्य |

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण आणि विकास आयोग (MAHED) तसेच आयोगाचे व्यवस्थापन मंडळ (BoM) किंवा राज्य शासन यांच्याकडून वेळोवेळी देण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी MahaSARC आवश्यकतेनुसार विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, औद्योगिक प्रतिनिधी व राष्ट्रीय संस्थांमधील सदस्यांना सहयोगी सदस्य करून घेईल किंवा बैठकांसाठी आमंत्रित करू शकेल.

आवश्यकतेनुसार आपली विविध कार्ये पार पाडण्यासाठी राज्यातील सार्वजनिक अकृषि विद्यापीठांचे १) कुलसचिव, २) संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, ३) विधी अधिकारी आणि ४) स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य यांची मदत घेण्याचे अधिकार MahaSARC ला असतील..

३. MahaSARC चे अधिकार आणि कर्तव्ये:-

३.१ राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP-२०२०) मधील तरतूदींनुसार आणि नियामक संस्थांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, बहुविद्याशाखिय तीन/ चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम,

ॲप्रेन्टीसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्रॅम्स (AEDP), पाच वर्षांच्या एकात्मिक/ एक किंवा दोन वर्षांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम, आणि दुहेरी (Dual) /संयुक्त (Joint) / सहयोगी (Twin) पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यासाठी आणि अध्यापन-अध्ययन व मूल्यांकन प्रक्रीयेमध्ये सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करणे आणि निर्गमित करणे.

या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी राज्यातील सर्व अकृषि सार्वजनिक विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालयांवर अधिनियमांतील तरतूदीनुसार बंधनकारक असतील.

३.२ राज्यातील अकृषि विद्यापीठांकरीता एकसमान शैक्षणिक दिनदर्शिका (Common Academic Calendar) तयार करणे.

MahaSARC प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी सर्व विद्यापीठांसाठी एकसमान शैक्षणिक दिनदर्शिका (Common Academic Calendar) तयार करेल. विद्यार्थ्यांना उपलब्ध करण्यात आलेल्या विविध स्तरावरील बहु प्रवेश व बहु निर्गमन सुविधेच्या अनुषंगाने राज्यातील विविध अकृषि विद्यापीठांतील विविध अभ्यासक्रम आणि अध्ययनक्रमांना वेगवेगळ्या स्तरावर समांतर प्रवेशासाठी सुसंगत/ अनुकुल वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यातील सर्व अकृषि सार्वजनिक विद्यापीठांसाठी प्रवेश व नोंदणी, अध्यापन व अध्ययन सत्रे, परीक्षा वेळापत्रक, मूल्यांकन कालावधी आणि निकाल जाहीर करण्यासाठी सुसंगत वेळापत्रक निश्चित करणारी एक समान शैक्षणिक दिनदर्शिका असणे अत्यावश्यक आहे. ही एकसमान शैक्षणिक दिनदर्शिका राज्यातील सर्व अकृषि सार्वजनिक विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालयांवर अधिनियमांतील तरतूदीनुसार बंधनकारक असेल.

३.३ ऑनलाईन अभ्यासक्रम/ मॉड्युल्स यांना मान्यता देण्याबाबत मार्गदर्शक सूचना विकसित करणे:-

सध्या अस्तित्वात असलेल्या आणि भविष्यात नवीन सुरु होणा-या पदवी अभ्यासक्रमांमध्ये महा-स्वयं, SWAYAM, SWAYAM Plus, NPTEL (National Programmes on Technology enhanced learning), क्षेत्रीय कौशल्य परिषद (Sector Skill Councils), राष्ट्रीय कौशल्य विकास मंडळ (NSDC) आणि नामांकित आंतरराष्ट्रीय विद्यापीठे या मंचांद्वारे उपलब्ध होणा-या ऑनलाइन मॉड्यूल्स / कोर्सेसचा समावेश करण्याच्या अनुषंगाने आवश्यक मानके, गुणवत्ता निकष, संरचना, मूल्यांकनाची मार्गदर्शक तत्त्वे, राष्ट्रीय श्रेयांक संरचनेतील स्तर (NCrF) आणि संरचित प्रारुपे MahaSARC कडून विकसित करण्यात येतील जी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मानकांशी सुसंगत आणि विद्यापीठ अनुदान आयोग, इतर नियामक संस्थांच्या मार्गदर्शक सूचना/ विनियमांच्या अधीन राहून करण्यात येतील.

३.४ पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रम रचनेमध्ये LOCF (Learning Outcome based Curricular Framework) दृष्टिकोनाची अंमलबजावणी आणि सुलभीकरण करणे:-

a. MahaSARC शिक्षण परिणामाधिष्ठित अभ्यासक्रम आराखडा (LOCF) विकसित करणे तसेच सदर प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (NSQF), राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा (NHEQF) आणि राष्ट्रीय श्रेयांक (क्रेडिट) आराखडा (NCrF) या तत्वांचा समावेश करुन अभ्यासक्रम रचनेसाठी मार्गदर्शक सूचना विकसित करेल.

b. MahaSARC शिक्षण परिणामांचे मुल्यमापन, अभ्यासक्रमाची सखोलता, मूल्यमापन व मुल्यांकन पद्धती, अध्यापन पद्धती आणि औद्योगिक सुसंगतता यांचे मुल्यांकन करण्यासाठी एकसंध मान्यतेचे प्रमाणित प्रारुप (Standardized Approval Template) विकसित करेल.

c. प्रत्येक विद्यापीठातील अभ्यास मंडळ (BoS), विद्याशाखा (Faculty) आणि विद्या परिषद (Academic Council) या MahaSARC च्या मार्गदर्शक सूचनांचा उपयोग

करुन श्रेयांकांची (क्रेडिटची) शैक्षणिक समतुल्यता (Academic Equivalence of Credits) निश्चित करण्याची यंत्रणा तसेच, अभ्यासक्रमांची/ कार्यक्रमांची शैक्षणिक उद्दिष्टे (Program Educational Objectives), अभ्यासक्रम व कार्यक्रम निष्कर्ष (Course and Program Outcomes) आणि मूल्यमापन प्रणालीची रचना करतील.

३.५ अभ्यासक्रम संकेतांक साठी (course code) मार्गदर्शक तत्त्वे विकसित करणे:-

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) मार्गदर्शक सूचनांनुसार, तीन/ चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम आणि एक/दोन वर्षांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम हे अध्ययन फलनिष्पती, काठीण्य पातळी आणि शैक्षणिक सखोलता, काटेकोरपणा या आधारावर विभागून अभ्यासक्रम संकेतांक (course code) स्वरूपात संरचित केले जातात. त्यानुसार पदवी, पदव्युत्तर आणि विद्यावाचस्पती (पीएच.डी.) अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक समकक्षतेसाठी MahaSARC अभ्यासक्रम संकेतांक (course code) आणि अभ्यासक्रम स्तरांविषयी मार्गदर्शक सूचना विकसित करेल.

३.६ राज्यातील विविध विद्यापीठे व स्वायत्त महाविद्यालये यामध्ये विद्यार्थ्यांच्या गतिशीलतेसाठी (mobility) शैक्षणिक समकक्षता आणि श्रेयांक (क्रेडिट) हस्तांतरण यंत्रणा स्थापन करणे:-

i) राज्यातील विविध विद्यापीठे व स्वायत्त महाविद्यालये यामध्ये विद्यार्थ्यांच्या गतिशीलतेसाठी शैक्षणिक समकक्षता आणि श्रेयांक (क्रेडिट) हस्तांतरण यंत्रणा स्थापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि प्रक्रिया MahaSARC विकसित करेल.

ii) MahaSARC उच्च शिक्षण (पारंपरिक आणि तांत्रिक) आणि व्यावसायिक शिक्षण (अल्पकालीन व दीर्घकालीन प्रशिक्षण- STT आणि LTT) यामध्ये राबविण्यात येणा-या विविध अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक समतुल्यता प्रणाली विकसित करेल.

iii) विद्यार्थ्यांच्या समांतर प्रवेशासाठी (lateral entry) किंवा वेगवेगळ्या संस्थांमधील गतिशीलतेसाठी (inter-institutional mobility), विशिष्ट शैक्षणिक स्तरा संदर्भात

(४.५ ते ८) समतुल्यता निश्चित करण्यासाठी संबंधित विद्यापीठांच्या अभ्यासक्रमातील निष्कर्ष (COs) व कार्यक्रम निष्कर्ष (POs), तसेच विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) किंवा संबंधित नियामक संस्थांच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे अतिरिक्त अध्ययन घटक/ क्रेडिट्सची आवश्यकता MahaSARC निश्चित करेल.

iv) MahaSARC प्रशिक्षण गरज विश्लेषण (Training Needs Analysis - TNA), तसेच प्राध्यापक प्रशिक्षण आणि क्षमता विकास आराखडे तयार करेल.

v) MahaSARC विद्यापीठांतील किंवा राज्यातील विविध विद्यापीठांमधील विविध शाखा/विद्याशाखांमध्ये विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रम/मॉड्यूल्स निवडण्याची आणि शिकण्याची शैक्षणिक लवचिकता (academic flexibility) प्रदान करणारी धोरणे ठरवेल.

३.७ अध्ययनाच्या अनुकुल गतीसाठी मार्गदर्शक तत्त्वे विकसित करणे:-

MahaSARC अधिक लवचिक शैक्षणिक दृष्टीकोन आणि अध्ययनाच्या अनुकुल गती (Adaptive pace of Learning) , त्वरीत अध्ययन (Accelerated Learning), विस्तारित अध्ययन (Extended Learning) आणि पूर्व अध्ययनाची मान्यता (Recognition of Prior Learning) याबाबत राष्ट्रीय श्रेयांक (क्रेडिट) संरचनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक प्रक्रीया, धोरणे आणि कार्यपद्धती निश्चित करेल.

३.८ विद्यापीठ-उद्योगजगत यांमध्ये सुसंवाद आणि साहचर्य प्रस्थापित करण्यासाठी प्रोत्साहन करणे:-

राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये परस्पर सहकार्य व समन्वयासाठी तसेच विद्यापीठे-उद्योगजगत व इतर संस्थांमधील सुसंवादासाठी MahaSARC मार्गदर्शक सूचना विकसित करेल. यासंदर्भात विद्यापीठ-उद्योग यांच्यातिल सुसंवाद वाढविण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), AICTE आणि इतर नियामक संस्थांनी दिलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे पालन करेल.

३.९ संशोधन आणि नवोन्मेष संस्कृतीला प्रोत्साहन देणे:-

MahaSARC धोरणात्मक आणि कार्यात्मक स्तरावर समन्वय साधत पुढील बाबींकरीता यंत्रणा तयार करेल:

i. आंतरविद्यापीठ सहकार्याच्या माध्यमातून राज्य/ राष्ट्रीय अभियानांशी सुसंगत मुलभूत संशोधन क्षमतांची निर्मिती.

ii. राज्यातील अकृषि सार्वजनिक विद्यापीठांतील संशोधन व विकास उपक्रम आणि राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योगांमध्ये सहकार्य घडवून नवोन्मेषाची भावना जोपासणे.

iii. विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये स्टार्टअप इकोसिस्टमसाठी KPIs (Key Performance Indicators) तयार करणे आणि चांगल्या नवकल्पनांच्या/ नवोपक्रमांच्या समर्थनासाठी प्रणाली सुलभ करणे.

४. MahaSARC ची कार्यात्मक यंत्रणा:-

४.१ MahaSARC चे कार्यालय:

MahaSARC साठी एक कायमस्वरुपी कक्ष महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या प्रशासकीय कार्यालयामध्ये कार्यरत असेल. त्यासाठी आवश्यक ती कार्यालयीन मदत महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयाकडून करण्यात येईल. MahaSARC च्या कार्यवाहीची माहिती (proceedings) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वेब पोर्टलवर जतन करण्यात येईल. MahaSARC ची व्यापक आणि महत्त्वाची भूमिका विचारात घेऊन MahaSARC च्या बैठका आयोजित करण्यासाठी, त्यांची नोंद ठेवण्यासाठी आणि त्यामधील निर्णयांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी (monitoring) एक सर्वसमावेशक ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येईल.

४.२ महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे MahaSARC चे समन्वयक तथा संयोजक म्हणून कार्य करतील. ते खालील प्रमुख जबाबदा-या पार पाडतील:

a. MahaSARC च्या बैठकींच्या नोंदी ठेवण्यासाठी आणि निर्णयांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी विविध लिंक पॉइंटसह ऑनलाइन पोर्टल विकसित करणे.

b. विद्यापीठांशी समन्वय राखण्यासाठी आणि आवश्यक पत्रव्यवहारासाठी कार्यालयीन सहाय्य प्रदान करणे.

c. शासन निर्णयांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे आणि MahaSARC ने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे विद्यापीठांकडून अनुपालन होण्याबाबतची खात्री करणे.

d. MahaSARC च्या बैठकांसाठी विषयसूची (agenda) तयार करणे.

e. विविध अकृषि सार्वजनिक विद्यापीठांचे अभ्यासक्रम पोर्टलवर अपलोड करता यावेत यासाठी ऑनलाइन लिंक उपलब्ध करुन देणे, जेणेकरुन MahaSARC कडून त्यांचा आढावा घेतला जाऊ शकेल.

४.३ MahaSARC च्या कामकाजाचे संचालन:-

MahaSARC कडे असलेल्या अत्यंत महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्यांचा विचार करता, त्याच्या मूलभूत कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व जबाबदा-यांवर (उपविभाग ३.१ ते ३.९) व्यापक गरज मूल्यांकन (needs analysis) केले जाणे आवश्यक आहे आणि त्यानुसार वेळोवेळी तपशीलवार कृती आराखडे तयार करणे आवश्यक आहे. हे ठरावीक कालमर्यादेत साध्य करण्यासाठी MahaSARC आणि MahaSARC चे समन्वयक तथा संयोजक हे विशिष्ट कार्यगट (Task Force) स्थापन करू शकते. MahaSARC दरवर्षी जानेवारी व जुलै महिन्यांमध्ये या कृती आराखड्यांचा व साध्य केलेल्या प्रगतीचा अहवाल व्यवस्थापन मंडळास सादर करेल.

MahaSARC च्या धोरणात्मक उपक्रमांचे कालांतराने परिणामाधिष्ठित कार्यमूल्यांकन (evaluation) करण्यात येईल. यासाठी बाह्य संस्थेची नियुक्ती केली जाऊ शकते.

४.४ MahaSARC च्या बैठकांचे आयोजन:-

MahaSARC च्या बैठकांचे आयोजन दरमहा केला जाईल आणि ७ दिवसांच्या पूर्वसूचनेवर बैठकां बोलावण्यात येतील. तथापि, अत्यावश्यक कारणांसाठी सदस्य कुलगुरूंच्या संमतीने अल्प सूचनेवर बैठक बोलवली जाऊ शकेल. MahaSARC च्या बैठकीचे कामकाज यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या विषयसूचीनुसारच पार पाडले जाईल आणि विषयसूचीमध्ये समाविष्ट केलेल्या विविध प्रस्तावांवर, अन्यथा ठरविण्यात आले नसल्यास क्रमाने विचार केला जाईल.

४.५ MahaSARC च्या बैठकींतील ठराव-

- महा-सार्कने घेतलेले निर्णय ठरावाच्या स्वरूपात नोंदवले जातील.
- विषयसूचीवरील सर्व प्रस्ताव शक्यतो एकमताने किंवा सर्वसंमतीने ठरवले जातील. मतभेद कायम राहिल्यास, उपस्थित सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेतला जाईल.
- ऑनलाइन बैठकीची कार्यवाही नोंदवली जाईल.
- प्रत्येक बैठकीनंतर ठरावांची नोंद व कार्यवाहीचे लेखाजोखा ठेवण्यासाठी ऑनलाइन प्रणाली विकसित केली जाईल व त्याचे व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या प्रशासकीय कार्यालयामार्फत (मुख्य कार्यकारी अधिकारी) केले जाईल.
- ऑनलाइन बैठका सुरळीत पार पाडण्यासाठी तसेच कार्यवाही नोंदवण्यासाठी आवश्यक पोर्टलचे तांत्रिक सहाय्य महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या प्रशासकीय कार्यालयामार्फत विकसित करण्यात येईल.
- बैठकीचे इतिवृत्त (minutes) MahaSARC च्या सदस्यांना पाठवण्यात येईल. सदस्यांकडून काही सूचना असल्यास, ती इतिवृत्त पाठविल्याच्या तारखेपासून एक

आठवड्याच्या आत MahaSARC कार्यालयाकडे पाठवाव्यात. त्या सूचना अध्यक्षांच्या निदर्शनास आणून देण्यात येतील आणि ते बैठकीतील इतिवृत्त खात्रीशीर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करतील.

४.६ विशेष विषयांवर चर्चा करण्यासाठी उपगटांची स्थापना:

आवश्यकतेनुसार, MahaSARC विविध विषयांवरील केंद्रित चर्चा सुलभ करण्यासाठी सदस्य कुलगुरूंपैकी एखाद्याच्या अध्यक्षतेखाली विशिष्ट क्षेत्रानुसार उपगट स्थापन करू शकते. (उदा. भारतीय व परकीय भाषा, समाजशास्त्र, निसर्गविज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वाणिज्य, व्यवस्थापन, फार्मसी, वास्तुकला, ललित, उपयोजित व सादरीकरण कला, कायदा, आंतरशाखीय अभ्यासक्रम इत्यादी). तसेच, राज्यातील अकृषि सार्वजनिक विद्यापीठांच्या विषयनिहाय अभ्यास मंडळांच्या अध्यक्षांच्या सहभागाने विषयनिहाय डिजिटल अभ्यास मंडळ (e-BoS) स्थापन करून नव्या अभ्यासक्रम विकासावर सविस्तर विचारमंथनही केले जाऊ शकते.

४.७ कार्यवाही अहवाल (Action Taken Reports - ATR):

MahaSARC द्वारे केलेल्या ठरावांची अमंलबजावणी करण्यासाठी सर्व विद्यापीठांना महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या व्यवस्थापकीय मंडळाकडून ( मुख्य कार्यकारी अधिकारी) यांचेकडून निर्गमित करण्यात येतील तसेच त्यानुषंगाने विद्यापीठाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल मागविण्यात येईल. विद्यापीठांकडून प्राप्त कृती अहवाल (ATR) MahaSARC च्या पुढील बैठकीत मांडले जातील.

४.८ महा-सार्ककडून व्यवस्थापन मंडळ व JBVC ला अहवाल सादरीकरण:

MahaSARC कडून करण्यात आलेली कार्यवाही, निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रणालीतील सुधारणा आणि धोरणात्मक शिफारसी याविषयीचे अहवाल MahaSARC चे समन्वयक/ संयोजक-उपाध्यक्ष दर सहा महिन्यांनी महाराष्ट्र राज्य

उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या व्यवस्थापन मंडळास माहिती व पुनरावलोकनासाठी सादर करतील. तसेच, मा. कुलपती यांच्या अध्यक्षतेखालील JBVC कडे माहितीसाठी सादर केले जातील.

४.९ अंदाजपत्रकीय तरतुदी:-

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीत भांडवली खर्चाचे स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करण्यात येईल. प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय व MahaSARC साठी आवश्यक कर्मचारी कंत्राटी तत्वावर बाह्यस्त्रोताद्वारे तसेच काही पदे उसनवारी तत्वावर उपलब्ध करून देता येतील..

४.१० खर्चाचे निकष:-

MahaSARC च्या बैठकींसाठीच्या खर्चासाठीचे निकष, राष्ट्रीय स्तरावरील संस्थांच्या (जसे IIT, IIM, IISER, NIT इत्यादी) संचालक मंडळ/ परिषदांच्या बैठकींसाठी ठरवलेल्या निकषांच्या धर्तीवर ठरवले जातील.

****************

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण- २०२५/ ई-१०८२८४०/ विशि-३
दिनांक २२.०४.२०२५ सोबतचे

## परिशिष्ट-ब

**Maharashtra State Academic and Research Council (MahaSARC)**

### 1. MahaSARC as State Level Apex Authority

The MahaSARC will serve as an advisory body for the Maharashtra State Commission for Higher Education and Development (MAHED) and the Board of Management (BoM) for formulation of policies on higher and technical education. It would also serve as a state level apex authority for dealing with the academic matters as explained in the succeeding paragraphs and advising the government on policies for promotion of research:

i. To facilitate and pave the way for seamless student mobility between or within Universities through a formal system of credit recognition, credit equivalency, and credit transfers to promote the distributed and flexible teaching-learning-assessment process.

ii. To provide academic equivalence across various Modules, Courses, and Programmes offered by different Universities in Maharashtra;

iii. To issue guidelines for the development of Credit Transfer Mechanism at different levels (4.5-8) as envisaged under the National Credit Framework (NCrF);

iv. To create a vibrant research and innovation culture through Collaborations, Cooperation, Coordination, and Synergy amongst the State Universities.

### 2. Composition of the MahaSARC

The composition of the MahaSARC will be as follows:

| Sr.No. | | Designation |
|---|---|---|
| **i** | The Vice-Chancellors of the top 5 NIRF ranking/ NAAC- A grade State Universities: : Also the VC, Sir J.J. school of Art, Architecture & Applied Art, Mumbai shall be included in MahaSARC whenever the subject related to Art education is being considered.<br><br>**One of the 5 Vice-Chancellors** will be designated **as Chairman** by the government. The tenure of the Chairman will be for a year. | - |

| | | | |
|---|---|---|---|
| **ii** | CEO of the Commission Secretariat (Member Secretary, BoM) | - | Convener and Vice-Chairman |
| **iii** | Three eminent educationists with one among them who has served as a Chairman/ Deputy Chairman of UGC or NAAC or AICTE etc. (Nominated by the government) | - | Member |
| **iv** | Two Pro-Vice-Chancellors to be nominated by the government | - | Member |
| **v** | Director-Higher Education, | - | Member |
| **vi** | Director-Technical Education | - | Member |
| **vii** | Four Deans representing four different Faculties from different Universities | - | Member |

The MahaSARC will co-opt or invite experts from eminent national institutes, industry sector, and diverse fields for carrying out the varied tasks that would be assigned to it by the MAHED or BoM or the government from time to time.

The MahaSARC will have the powers to seek the assistance of the DBOEEs Registrars, Law Officers of the state public universities and Principals of Autonomous Colleges for carrying out various functions:

**3. Powers and Duties of the MahaSARC**

**3.1** To prepare and issue guidelines for Curricular Framework and Reforms in Teaching, Learning, and Assessment in line with the NEP Policy and in consonance with the Guidelines issued by the Regulatory Bodies for Multidisciplinary Three/Four-year degrees, Apprenticeship Embedded Degree Programs (AEDP), Five-year integrated/ 1 or 2 Years PG programs, and Dual/ Joint/ Twinning Degree Programs.

The Curricular Framework guidelines issued by the MahaSARC shall be binding on all State Public Universities (SPU) and Autonomous Colleges in Maharashtra.

**3.2 Design of Common Academic Calendar for Universities across Maharashtra State:-**

The MahaSARC will lay down a Common Academic Calendar (CAC) for every academic year. In order to create a conducive atmosphere for the students to pursue different Courses and Programs from different Universities as well as for lateral entry at different levels and for multiple entry and exit options, it is essential

to have a CAC for Universities across the State which provides for uniform schedules, by and large, for Admission and Enrolment, Teaching and Learning sessions, Examination Time Table, Evaluation Period and Result Declaration.

This CAC shall be binding on all State Public Universities (SPU) and Autonomous Colleges in Maharashtra.

**3.3 Development of guidelines for Approval of Online Courses and Modules:-**

The MahaSARC will frame policies and guidelines to define the Criteria, Quality Benchmarks, Framework, Assessment Guidelines, NCrF Level, and Structured Templates for the integration of Online Modules/ Courses floated by Maha-Swayam, SWAYAM, SWAYAM Plus, NPTEL, Sector Skill Councils, NSDC Academy and renowned International University Platforms into the Curriculum of Existing/ Future Degree Programs. This shall be done in consonance with the National/ Global Academic Standards and Guidelines/Regulations of UGC and other Regulatory Bodies.

**3.4 Facilitation of LOCF Approach into the design of UG and PG Curriculum:-**

a. The MahaSARC will lay down the guidelines for the development and facilitation of the Learning Outcome based Curricular Framework (LOCF) approach in the Curriculum Design while incorporating the principles of NSQF, NHEQF, and NCrF.
b. The MahaSARC will develop a standardized approval template for Assessing Learning Outcomes, Curriculum Depth, Assessment and Evaluation Methods, Pedagogical Approach, and Industry Relevance.
c. Each University BoS, Faculty, and Academic Council will use these guidelines to develop the mechanism for the Academic Equivalence of Credits, and design of Program Educational Objectives (PEOs), Course Outcomes (COs), and Program Outcomes (POs), and development of Assessment Systems.

**3.5 Development of Guidelines for Coding of Courses:-**

As per UGC Guidelines on ‘Curricular Framework and Credit System for the Four-Year Undergraduate Programme’, Courses in the Three/ Four-Year UG, and 1/ 2 Year PG Programme are structured in the form of codes, which are segregated based on Learning Outcomes, Level of Difficulty, and Academic rigour. The MahaSARC will lay down the guidelines on Codes and Levels of Courses for UG, PG, and Ph. D. Programme for Academic Equivalence.

**3.6 Establishing Academic Equivalences and Credit Transfer Mechanisms through creation of policy for the mobility of students among various Universities and their Autonomous Colleges of the State:-**

i) The MahaSARC will develop clear guidelines and process for establishing academic equivalences and Credit Transfer Mechanisms for the mobility of students among various universities of the State.

ii) The MahaSARC will develop the academic equivalence systems for various programs of study including those being implemented within Higher Education (both general and technical) and Vocational Education (STT and LTT).

iii) The MahaSARC will prescribe the requirement of any additional Learning Modules/ Credits in line with the guidelines of UGC/ the concerned regulating bodies and the corresponding University Curriculum COs and POs for establishing the equivalence for lateral entry/ inter-institutional mobility of the students for the specific academic level (4.5-8).

iv) The MahaSARC will prepare frameworks for Training Needs Analysis (TNA), and Faculty Training and Development Plans.

v) The MahaSARC will also lay down the policy for giving the academic flexibility to students to choose and learn different courses/ modules among different disciplines/ faculties in a university or across different universities in the State.

**3.7 Development of guidelines for Adaptive Pace of Learning:-**

The MahaSARC will work out the procedures, policies, and practices to introduce a more flexible approach to education and an 'adaptive pace of learning'- Accelerated Learning', Extended Learning' and 'Recognition of Prior Learning' (RPL) in line with National Credit Framework.

**3.8 Promotion of University-Industry Interactions and Linkages:-**

The MahaSARC will develop guidelines on promoting co-operation and co-ordination of the various State Universities among themselves and explore the scope for interaction between the universities on the one hand, and industry and other organisations on the other hand. In this regard, it will follow various guidelines given by UGC, AICTE and other Regulatory Bodies for strengthening University-Industry Interactions and Linkages.

### 3.9 Promotion of vibrant Research and Innovation Culture:-

The MahaSARC will create synergy at policy and operative level mechanism for

i. developing the core research capabilities, aligned with State/ National Missions, through Inter-University Collaborations,

ii. cultivating the spirit of Innovation through co-operation between various research and development activities in Universities in the State and various industries at State, National and International levels, and

iii. creating the KPIs aligned to the Startup Ecosystem at Universities and Colleges and facilitating the support system for incubation of good ideas.

## 4. Functional Mechanism of the MahaSARC

### 4.1 The MahaSARC Office

The MahaSARC will have a permanent cell in the office of the CEO, MAHED. The ministerial support for it will be provided by the secretariat of the CEO. The proceedings of the MahaSARC will be maintained in the web portal of the Department of Higher and Technical Education. Considering the wide and pivotal role that it plays, a comprehensive online system shall be built for conducting the meetings, record keeping and for monitoring the implementation of the various decisions.

### 4.2 Role of CEO as the Coordinating Officer cum Convener

The Chief Executive Officer (CEO) of the Commission Secretariat, reporting to the Board of Management under MAHED, will be the Coordinating Officer cum Convener for the development of Online Portal to facilitate the MahaSARC operations in terms of Conduct and Record Keeping of Meetings of MahaSARC. The CEO will serve as the Coordinating Officer cum Convener with following key responsibilities:

a. Development of Online Portal with various Linkage Points for Record Keeping of MahaSARC Meetings and for monitoring the implementation.
b. Providing the ministerial support for coordination with the Universities and all necessary correspondence with them.
c. To ensure implementation of the decisions of the government and compliance by the universities of the guidelines issued by the MahaSARC.
d. Setting the agenda for the MahaSARC Meetings.
e. Providing for online link in the Portal for uploading of the Curriculum of different Universities so as to enable the review by MahaSARC.

### 4.3 Conduct of the Business of the MahaSARC

Considering the highly important roles that the MahaSARC has to play, it is incumbent that a comprehensive needs analysis is done on all the activities that constitutes its core responsibilities (subsections 3.1-3.9) and the detailed action plans are prepared from time to time. In order to achieve this in a time bound manner, the MahaSARC and in turn the CEO secretariat may constitute specific task forces. The MahaSARC shall present the action plans and the achievements thereof to the BoM in the months of January and July every year.

There shall be a periodical outcomes based performance evaluation of the policy activities of MahaSARC for which an external agency may be appointed.

### 4.4 The MahaSARC Meetings

The MahaSARC meetings shall be held at monthly intervals and may be convened with a 7 day advance intimation. However, meetings may be convened at shorter notice, for urgent purposes, with the consent of member Vice-Chancellors.

The business at the meeting of the MahaSARC shall be transacted in accordance with the agenda issued for the purpose and the various proposals placed on the agenda shall be considered serium, unless otherwise decided at the meeting.

### 4.5 Resolutions of the MahaSARC Meetings:

- The decisions of the MahaSARC shall be recorded in the form of resolutions.
- All proposals on the agenda of the MahaSARC shall be decided preferably by consensus or unanimous decisions. If differences persist, the resolution shall be decided by a majority of votes of the members present.
- Proceedings of the online meeting shall be recorded.
- An online system shall be developed for the Record of Meeting-wise Resolutions and Recording of the Proceedings shall be maintained by office of the CEO of the Commission Secretariat.
- The Technical support for smooth conduct of online meetings and development of necessary portal for maintaining the Record shall be developed by the office of the CEO of the Commission Secretariat.
- The minutes of the Meeting shall be circulated to the members of the MahaSARC. Comments of the members, if any, shall be sent to the MahaSARC office within one week from the date of dispatch of the minutes

and shall be brought to the notice of the Chairman, who shall take necessary action on the confirmation of Minutes of Meeting.

**4.6 Formation of Subgroups for subject specific discussions:**

Wherever required, the MahaSARC may form domain-specific subgroups headed by one of the Member Vice-Chancellors to facilitate focused discipline-specific discussion (Indian and Foreign Languages, Social Sciences, Natural Sciences, Engineering and Technology, Commerce, Management, Pharmacy, Architecture, Fine, Applied, and Performing Arts, Law, Interdisciplinary Area Subjects, etc) and deal with issues related to the specialised areas of studies. It may even facilitate formation of discipline-wise e-BoS comprising of Chairman of respective discipline-wise Board Studies of Universities across State for brainstorming discussion on new curriculum development, as and when required.

**4.7 Action Taken Reports (ATR):**

The confirmed Resolutions, for the necessary actions/ executions, shall be circulated to all the Universities by the office of the CEO of the Commission Secretariat. The office shall seek Action Taken Report (ATR) from all / concerned Universities which shall be placed as agenda item before the next meeting.

**4.8 Reports of the MahaSARC to the Board of Management and JBVC:**

The MahaSARC will submit reports on its functioning, guidelines issued, and improvements brought in the systems and policy recommendations, for information and review by the Board of Management under MAHED, Government of Maharashtra every six monthly and for information to the JBVC chaired by Hon’ble Chancellor through the office of the CEO of the Commission Secretariat.

**4.9 Budgetary Provisions:**

A separate budgetary head shall be created in the capital expenditure account of the Department of Higher and Technical Education. To start with the staff of the CEO office and the MahaSARC may be provided on contractual basis through an outsourcing agency and few deputation posts.

**4.10 Expenditure norms:**

The norms for the expenditure on Conduct of the Business of the MahaSARC would be designed on the lines of those for the conduct of meetings of BoG/Councils for Institutes of National Importance (IITs, IIM, IISER, NIT etc).